**MAHASAGAR**

Monday, Feb 22, 2010.

# नागपूरमधील आय एम टी नागपूर महाविद्यालय 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१०'च्या नागपूर विभागाचे विजेते

नागपूर, २१ फेब्रुवारी - 'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१०' च्या सहाव्या कडीला शनिवारी २० फेब्रुवारी २०१० रोजी नागपूर येथील प्रादेशिक फेरीने सुरुवात झाली. मेंदूला चालना देणाऱ्या या चुरशीच्या चढाओढीमध्ये आय एम टी महाविद्यालयाची नेहा कटीयाल आणि श्री सौम्याजीत सामंता विजेते ठरले. ही प्रादेशिक फेरी अत्यंत् अटीतटीची आणि रंगतदार ठरली.

'टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझ २०१०'च्या यावर्षीच्या सत्रामध्ये ज्या चार नवीन शहरांची (मणिपाल, रांची अणि गुवाहाटी ही इतर शहरे) भर पडली आहे त्यात एक नागपूर आहे. ही नवीन भर पडल्यामुळे आता ही स्पर्धा यंदा २० शहरांमध्ये (गतवर्षी ती १६ शहरांमध्ये होती) पोहोचली आहे. या आयोजनासाठी व्ही.एन.आय.टी. चे रजिस्टार श्री.भास्कर गणवीर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विजेत्यांना ७५,००० रुपयांची रोख बक्षिसे आणि इतरही पारितोषिके देऊन गौरविले. नागपूरमधील हा विजेता संघ आता भारतभरातील इतर १९ शहरांमधील प्रादेशिक विजेत्यांसमोर उभा ठाकणार आहे. ही अंतिम फेरी मुंबईत एप्रिल २०१० च्या सुरुवातीला होणे अपेक्षित आहे.

व्ही.एन.आय.टी. कॉलेजातील उपविजेत्यांना ३५,००० रुपयांचे रोख बक्षिस देऊन गौरविण्यात आले. नागपूर प्रादेशिक फेरीमध्ये या विभागाच्या विविध भागातून साधारण १३० संघ सहभागी झाले होते. या प्रश्नमंजूषेचे सूत्रसंचालन क्वीझमास्टर श्री गिरी बालसुब्रमण्यम उर्फ पिकब्रेन यांनी केले. यावर्षी, टाटा क्रुसीबल कॅम्पस क्वीझमध्ये आव्हानात्मक, नवीन फॉरमॅट दाखल झाले असून ते २०:२० क्रिकेटवर आधारीत आहे. या प्रश्नमंजूषा स्पर्धेत पाच फेऱ्या असून त्यात स्पर्धकांच्या तार्किक आणि कारण मिमांसा क्षमतेची तसेच विचारशक्तीच्य गतीची कसोटी लागते.